कोर्ट

Additional Sessions Judge
Palghar

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

दाखल तारीख 16/11/2021

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): पालघर    P.S.(ठाणे): पालघर    Year (वर्ष): 2021

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0262    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 16/11/2021 07:30 वाजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):

1. Day(दिवस): दरम्यानी दिन    Date From (दिनांक पासून): 01/11/2021

Time Period (कालावधी):    Date To ( दिनांक पर्यंत): 15/11/2021

Time From (वेळेपासून): 00:00 वाजे

Time To (वेळेपर्यंत): 00:00 वाजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक ): 16/11/2021    Time (वेळ): 00:00 वाजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ

Entry No. (नोंद क्र.): 003    Date & Time (दिनांक आणि वेळ): 16/11/2021 03:55 वाजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 1 किमी

Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): पालघर,ताडहाणू, जिल्हा र

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): राजेश रामूभाई पटेल

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1972    (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):    Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कामोठे, नवी मुंबई, तापनवेल, ज,पालघर,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कामोठे, नवी मुंबई, तापनवेल, ज,पालघर,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9377509731

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | किशोर पंडितराव बडगुजर | | | 1. कामोठे, नवी मुंबई, तापनवेल, ज, पालघर,पालघर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्कवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी राजेश रामूभाई पटेल, वय 49 वर्षे, धंदा-नोकरी, राहणार- रूम नं.06, तारा अपार्टमेंट, मेन रोड बोर्डी, स्टेशन घोलवड,ता.डहाणू, जि. पालघ र मोबाईल क्र.9377509731 समक्ष फिर्याद लिहुन देतो की, मी वापी येथे खाजगी कंपनीमध्ये नोकरी करतो. माझा मुलगा श्री. समय राजेशकुमार पटेल हा बारावी सायन्स उत्तीर्ण असून त्याला इंजिनीअर करीता अँडमिशन घ्यावयाचे आहे. त्याकरीता जातपडताळणी प्रमाणपत्राची आवश्यकता आहे माझी जात हिंदू भंडारी अशी असून ती इतर मागास वर्गातील आहे. माझे मुलाने दिनांक 08/01/2021 रोजी जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्याकरीता ऑनलाईन अर्ज केलेला आहे. सदर अर्जाचे अनुषंगाने दिनांक 14/06/2021 रोजी दुपारी 12.25 वाजता कागदपत्रासह हजर राहण्याबाबत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पालघर कार्यालयाकडून पत्र प्राप्त झालेले होते. त्याअनुषंगाने दिनांक 14/06/2021 रोजी मी माझे मुलासह जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय पालघर पूर्व येथे गेलेलो होतो. व जातपडताळणीचे अनुषंगाने सर्व कागदपत्रे मी सादर केलेली आहेत. त्यावेळी सदर कार्यालयाकडील अधिकारी यांनी मला व माझा मुलगा यांना सांगितले की, जात पडताळणी प्रमाणपत्र पोस्टाने पाठविले जाईल. परंतु मुलाचे जात पडताळणी प्रमाणपत्र पोस्टाने आले नसल्याने मी दिनांक 01/11/2021 रोजी सदर कार्यालयात जावून चैकशी केली असता तेथील किशोर साहेब यांनी मला सांगितले की, तुमची फाईल रिजेक्ट झालेली आहे. फार मोठी प्रोसिजर आहे. त्यासाठी तुम्हाला 50,000/-रूपये दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना इतके पैसे देवू शकत नाही असे सांगितले असता त्यांनी मला 10,000/-रूपये दया असे सांगून 10,000/-रूपये घेवून येण्यास सांगितले. परंतु मला किशोर साहेब यांना 10,000/-रूपयाची लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने मी दिनांक 15/11/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कम्प पालघर कार्यालयात जावून पोलीस निरीक्षक श्री.स्वपन बिश्वास यांचेकडे स्वहस्ताक्षरात श्री. किशोर पंडितराव बडगुजर, संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पालघर, यांचेविरूध्द लेखी तक्रार दिलेली होती. मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी लागलीच पोलीस निरीक्षक श्री.स्वपन बिश्वास यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना पत्र पाठवून दोन पंच साक्षीदार बोलावून घेवून त्यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर त्यांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकीगत समजावून सांगून पोलीस निरीक्षक श्री.बिश्वास यांनी लोकसेवक श्री. किशोर बडगुजर यांचे कार्यालयात जावून त्यांच्याकडे माझे मुलाचे जात पडताळणी प्रमाणपत्राचे अनुषंगाने लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत पंचासमक्ष पडताळणी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे लागलीच दिनांक 15/11/2021 रोजी सर्व कायदेशिर कारवाई करून माझे अंगावर व्हाँईस रेकॉर्डर लावून मला व पंच नं.01 यांचेसह पायी चालत लोकसेवक किशोर बडगुजर यांचे पालघर पुर्वेकडील जात पडताळणी कार्यालयात पाठविले. मी जात पडताळणी कार्यालयात जावून श्री. किशोर बडगुजर यांची भेट घेतली असता त्यांनी मला तुम्ही बाहेर थांबा तुमचा नंबर आला की मी बोलावतो असे सांगितले त्याप्रमाणे मी त्यांचे केबिनच्या बाहेर थांबून राहिलो. त्यावेळी क्रमाक्रमाने जात पडताळणीबाबत सुनावणी चालू होती. ज्यावेळी माझा नंबर आला त्यावेळी श्री. किशोर बडगुजर यांनी

मला आतमध्ये बोलावून तुमची फाईल रिजेक्ट झालेली आहे. तुम्हाला आम्ही फोन करून पुढील प्रोसिजरबाबत कळवू असे सांगून पुन्हा केबिनच्या बाहेर थोडा वेळ थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी पुन्हा बाहेर थांबून राहिलो. त्यानंतर त्यांनी पुन्हा मला 15-20 मिनिटांनी परत बोलावून घेवून सांगितले की, तुमची फाईल रिजेक्ट झालेली आहे त्याच्या पुढची प्रोसिजर करण्यासाठी तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासाठी प्रथमतः 25,000/-रूपये मागितले परंतू मी सदरची रक्कम देण्यास असमर्थता दर्शविल्याने शेवटी तडजोडीअंती 10,000/- रूपये दया असे बोलून दहा मिनिटांमध्ये पैसे घेवून या असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना ठिक आहे असे सांगून पंच नं. 01 यांचेसह निघून पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.बिष्वास यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉडर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता त्यामध्ये श्री. किशोर बडगुजर संषोधन अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पालघर यांनी माझेकडे माझे मुलाचे जात पडताळणीचे प्रमाणपत्राचे काम करण्यासाठी तडजोडीअंती 10,000/-रू.लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम लागलीच. घेवून येण्यास सांगितल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.बिश्वास यांनी लागलीच शासकिय वाहनामध्ये सापळापुर्व पंचनाम्याची कायदेशिर पूर्तता करून रात्रौ 20○:00 वाजताच्या सुमारास माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून मी हजर केलेल्या 10,000/- लाचेच्या रक्कमेस अँथ्रासिन पावडर लावून सदरच्या रक्कमेसह मला पंच नं.01 श्री.दुबळा यांचेसोबत श्री. किशोर बडगुजर यांचे पालघर पुर्वेकडील, जात पडताळणी कार्यालयामध्ये पायी चालत श्री. किशोर बडगुजर यांची भेट घेण्यासाठी पाठविले. त्याचवेळी आमचे मागोमाग अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाचे सापळा पथक जात पडताळणी कार्यालयाचे आजू बाजूस व कार्यालयाचे परिसरामध्ये कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावून थांबले.त्यानंतर मी पंच नं.01 श्री.दुबळा यांचेसह पालघर पुर्वेकडील, जात पडताळणी कार्यालयामध्ये जावून श्री.किशोर बडगुजर यांची त्यांचे केबिनमध्ये भेट घेवून लाचेची रक्कम देण्यास माझा हात माझे पन्टच्या खिशामध्ये घातला त्यावेळी श्री. किशोर बडगुजर यांनी मला पैसे इथे नको देवू असे इशा-याने सांगून मला त्यांचे कार्यालयातील किचनमध्ये घेवून गेले व तेथे त्यांनी मला हाताचे इशा-याने किती पैसे आणले याबाबत विचारणा केली असता मी त्यांना 10,000/-रूपये असल्याचे सांगून लाचेची रक्कम त्याच्यासमोर धरली असता त्यांनी ती स्विकारून त्यांचे पन्टच्या पाठीमागिल उजव्या खिशामध्ये ठेवून दिली. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवून श्री.किशोर बडगुजर यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत चेह-यावरील मास्क खाली करून सापळा पथकास पुर्वनियोजीत ईशारा केला असता, पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप व पोलीस निरीक्षक श्री.बिश्वास यांनी लोकसेवक श्री. किशोर बडगुजर यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. तसा सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे. तरी लोकसेवक श्री. किशोर पंडितराव बडगुजर, संषोधन अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पालघर, (वर्ग-2) रा. जे/606, सिल्वर क्रेस्ट, जिओ मट्रीक्स, सेक्टर 25, कामोठे, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड पिन.410209 यांनी माझे मुलाचे वैध जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासाठी 10,000/-रू लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दिनांक 15/11/2021 रोजी सायंकाळी 20○:31 वाजताचे सुमारास जात पडताळणी कार्यालय पालघर येथील त्याचे कार्यालयाचें किचनमध्ये स्विकारले असताना अन्टी करप्षन ब्युरो, ठाणे (कम्प पालघर) या कार्यालयाचे सापळा पथकाने रंगेहात पकडले आहे म्हणून माझी लोकसेवक श्री.किषोर पंडितराव बडगुजर, संषोधन अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पालघर, (वर्ग-2) रा. जे/606, सिल्वर क्रेस्ट, जिओ मट्रीक्स, सेक्टर 25, कामोठे, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड पिन.410209 यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे. सदरची फिर्याद ही मी सांगितल्याप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलीखीत केली असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** RAM EKNATH BHALSINGH(I (Inspector)) / POBN56321 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** PI २०५०१ विश्वास ACB पालघर
**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. Signature/Thumb impression of the complainant / Informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पालघर पोलीस ठाणे

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): RAM EKNATH BHALSINGH
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): POBN56321